महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५७ वा | दिनांक : ०९/०८/२०२५ | वार : शनिवार

# मनसे- ठाकरे गटाच्या पहिल्याच बैठकीत वाद



**नाशिक :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाची एकत्रित बैठक नाशिक मध्ये आयोजित करण्यात आली होती. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गट आणि मनसे एकत्र निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले होते. मात्र दोन्ही पक्षाच्या या पहिल्याच एकत्रित बैठकीत ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये वाद झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे या बैठकीतील मुद्द्यांची चर्चा रंगल्या पेक्षा बैठकीतील राड्याचीच जोरदार चर्चा नाशिकमध्ये रंगली होती. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याचे सांगितले जात आहे. दोन्ही पक्षाच्या प्रमुख नेत्यांसह सर्वच नेत्यांनी याबाबत सकारात्मक संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये महाराष्ट्रात नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत नाशिक शहरातील रस्त्यावरील खड्डे, वाढती गुन्हेगारी, अनियमित होणारा पाणीपुरवठा, शेतकऱ्यांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर चर्चा होणार होती. मात्र या बैठकीत विधानसभा निवडणुकीतील प्रचाराच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाचे नेते आपसांत भिडले. त्यामुळे बैठकीला वेगळेच वळण प्राप्त झाले होते.

ठाकरे गटाचे नेते जयंत दिंडे यांनी आपल्या भाषणामध्ये विधानसभा निवडणुकीत स्वतःचे अनुमान मांडले. त्यात नाशिक मध्य विधानसभा मतदार संघात वसंत गिते यांचा पराभव का झाला? याचा उहापोह देखील त्यांनी केला. निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी एमडी ड्रग्ज आणि इतर मुद्दे आपण नीट हाताळले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मात्र त्याचवेळी या निवडणुकीत प्रचाराची जबाबदारी असलेले माजी महापौर विनायक पांडे यांनी दिंडे यांनी मांडलेला मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दोन्ही गटामध्ये चांगलाच वाद झाला. त्यानंतर विनायक पांडे यांनी बैठकीतून काढता पाय घेतला.

## मनपा मनमानी पद्धतीने नागरिकांच्या मालमत्ता पाडू शकत नाही अंबादास दानवे यांचे मनपा प्रशासनाला खडेबोल




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने शहरात अतिक्रमण विरोधी कारवाई म्हणून अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात येत आहे. मात्र अनेक नागरिकांनी वैध मालमत्ता सुद्धा अतिक्रमण म्हणून महानगरपालिका पाडत आहे. मनपा मनमानी पद्धतीने नागरिकांच्या मालमत्ता पाडू शकत नसल्याचे खडे बोल शिवसेना नेते तथा राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज बैठकीत प्रशासनाला सुनावले.महानगरपालिकेने किती वैध व अवैध मालमत्ता पाडल्या याची नोंद आहे का? शहर विकासासाठी म्हणून पाडलेल्या मालमत्तांना भरपाई कशा प्रकारे देणार असल्याचा जाब दानवे यांनी विचारला. या संदर्भात त्यांनी मनपा अधिकाऱ्यांची बैठक घेत त्यांची कानउघाडणी केली.एमजीएम परिसरात हिंदूहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांचे होत असलेल्या भव्य स्मारक आणि संग्रहालयाची देखील त्यांनी पाहणी केली. स्मारकाचे आणि संग्रहालयाचे प्रलंबित काम तातडीने मार्गी लावण्याची सूचना यावेळी त्यांनी केली. पाणी आणि वादळ यामध्ये तग धरेल अशाप्रकारे मजबूत पुतळा उभारण्यात यावा. शिवसेनाप्रमुखांचा पुतळा कुठे तयार करण्यात येत आहे, याची दानवे यांनी माहिती घेतली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सदरील स्मारकास मुबलक निधी दिला. मात्र, महायुती सरकारचे शासन आल्यापासून निधीच्या अभावी स्मारकाचे काम प्रलंबित असल्याचा आरोप करत आगामी काळात प्रशासकीय आणि शासन स्तरावर असलेल्या प्रलंबित प्रक्रिया पूर्ण करून काम मार्गी लावण्याची सूचना अंबादास दानवे यांनी केली.

घाटी हे सर्वसामान्यांचे हक्काचे रुग्णालय आहेत, आलेल्या रुग्णांना दर्जेदार सुविधा द्या. प्रलंबित कामे आणि शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे त्यांनी आढावा घेतला. विविध वॉर्डात जाऊन त्यांनी रुग्णांशी संवाद साधत आरोग्यसेवा जाणून घेतली. यावेळी घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दानवे यांचे स्वागत करत कामकाजाची माहिती दिली. मराठवाडा, विदर्भ, खान्देश आदी भागातून रुग्ण मोठ्या येतात. सर्वसामान्य लोकांना चांगली आरोग्यसेवा मिळावी, चांगल्या दर्जाचे उपचार करण्याची सूचना दानवे यांनी केल्या.अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी घाटीत सुरु असलेल्या विविध विकासकामे, उपक्रमाची माहिती दिली. घाटी रुग्णालयात आलेल्या प्रत्येक रुग्णाला उत्तम सेवा देत असल्याने दानवे यांनी घाटीच्या कामाचे कौतुक केले.

## महाराष्ट्रात मतदार यादीत फेरफार झाला : राहुल गांधी यांच्या नंतर सपा नेते अबू आझमी यांचाही दावा



**मुंबई :** समाजवादी पक्षाचे नेते आमदार अबू आझमी यांनी देखील भारतीय निवडणूक आयोगावर टीका केली आहे. सत्ताधारी भाजपप्रती आयोगाने उघड पक्षपातीपणा दाखवल्याचा आणि महाराष्ट्रातील मतदार यादीत फेरफार केल्याचा आरोप त्यांनी केला.

पत्रकारांशी बोलताना, सपचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुखांनी दावा केला की, गेल्या वर्षी निवडणुकीच्या सहा महिने आधी मानखुर्द-शिवाजी नगर विधानसभा मतदारसंघात अवैध मतदारांची नावे जोडण्यात आली होती. वैध मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आणि त्या जागी अनिवासींची नावे त्या वेळी मतदार यादीत बदलण्यात आली. मतदार याद्यांचे तातडीने ऑडिट करण्याची आणि अधिक विसंगती टाळण्यासाठी जलद दुरुस्त्या करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा दाखला देत आझमी म्हणाले की, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि ज्येष्ठ बाळासाहेब थोरात यांच्यासह प्रमुख काँग्रेस नेत्यांचा पराभव हा चुकीच्या यादीचा पुरावा आहे. लोकांनी निवडणूक आयोगाच्या चुकीच्या कृत्यांविरुद्ध रस्त्यावर उतरून निषेध केला पाहिजे, असे आवाहन देखील आझमी यांनी केले आहे. लोकशाही प्रक्रियांचे रक्षण करण्यासाठी जबाबदारीची गरज त्यांनी अधोरेखित केली.

आझमी यांनी अमेरिका आणि इस्रायलच्या धोरणांवरही निशाणा साधला आणि म्हटले की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याप्रमाणे आमचे नेतेही दावे करतात, पण सत्य बाहेर काढत नाहीत. अमेरिका आणि इस्त्रायलच्या उत्पादनांवर बहिष्कार टाकला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. अबू आझमी यांच्या मते, भारताने शेजारील देश बांगलादेश, पाकिस्तान, भूतान, श्रीलंका आणि नेपाळशी चांगले संबंध राखले पाहिजेत. लोहिया यांच्या विचारांचा हवाला देत त्यांनी अमेरिकेची दादागिरी संपवण्याचे समर्थन केले.

याशिवाय, सपा नेत्याने धार्मिक भावनांच्या अपमानाबद्दल चिंता व्यक्त केली. धार्मिक व्यक्तींविरुद्ध अपमानास्पद बोलणाऱ्यांना, मग ते देव-देवता असोत, कुराण असोत, वेद असोत, गांधीजी असोत किंवा शिवाजी महाराज असोत, त्यांना किमान १० वर्षांची शिक्षा झाली पाहिजे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## संशोधन शास्त्रातील सर्वेक्षण पद्धती या विषयावर बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न




**जालना :** आपले संशोधन सकस आणि दर्जेदार बनवायचे असेल तर सर्वेक्षणाशिवाय पर्याय नाही. सर्वेक्षण हे प्राथमिक तथ्य संकलनाचे महत्त्वाचे माध्यम असून सामाजिक शास्त्रामध्ये सर्वेक्षण पद्धतीला महत्त्वाचे स्थान आहे. या तथ्य संकलनाद्वारे प्रत्यक्ष आणि वास्तवदर्शी समाजाचे चित्र आपणाला मांडता येते. हे अनुभवजन्य माध्यम असून या आधारे धोरण निश्चितता, नियोजन आणि प्रश्नाची सोडवणूक करता येऊ शकते असा सूर या कार्यशाळेत निघाला. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन शास्त्रातील सर्वेक्षण पद्धती या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा आज बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयाच्या डॉ. राजेश्वरी देशपांडे यांनी सर्वेक्षण करीत असताना घ्यावयाची काळजी या विषयी तर प्रा. शिवाजी मोटेगावकर यांनी प्रश्नावली कशी भरावी व त्यातील येणाऱ्या अडचणी या संदर्भात ऑनलाइन मार्गदर्शन केले.प्रा. श्रीकृष्ण परिहार यांनी क्षेत्रीय अभ्यास हा किती महत्त्वाचा आहे हे विविध संदर्भ देऊन स्पष्ट करून आजच्या आजच्या मानवाच्या समस्या ह्या बहुमुखी आणि जटिल झाल्या असून त्याची व्यवस्थित सोडवणूक करावयाचे असेल तर आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन विकसित करावा लागेल त्यासाठी सर्व सामाजिक शास्त्रांची एकत्रित भूमिका महत्त्वाची ठरणार आहे असे स्पष्ट केले. पदवी स्तरावर विद्यार्थ्यांना आता यापुढे संशोधन प्रकल्प सादर करावा लागणार आहे. संशोधन प्रकल्प सादर करीत असताना विद्यार्थ्याने कोणकोणती काळजी घ्यावी या अनुषंगाने यावेळी चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधान करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील कल्याणकारी योजनांचा अभ्यास कशा पद्धतीने करावा या संशोधन प्रकल्प या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. प्रारंभी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.बळीराम कटारे यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील व विद्यापीठातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी प्रा. विलास भुतेकर, प्रा. प्रियदर्शन भवरे, प्रा. कालिदास सूर्यवंशी, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. भगवानसिंग डोभाळ, प्रा. कल्याण कुंभार, प्रा. संदीप पाटील, प्रा.डॉ.रवींद्र भोरे, प्रा. व्यंकटेश कोरेबोईनवाड, यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंडिया पीस टूर २०२५ पुण्यात यशस्वीपणे पार पडला




**पुणे :** ऑगस्ट २०२५ – आंतरराष्ट्रीय संस्था *HWPL* यांच्या इंडिया पीस टूर २०२५ चा यशस्वी समारोप पुण्यात झाला. या दौऱ्याचा उद्देश जगभर शांततेचा संदेश पोहोचवणे, तरुणांमध्ये नेतृत्व विकसित करणे, तसेच विविध धर्मांमधील संवादाला चालना देणे हा होता.*दोन आठवड्यांचे कार्यक्रम (३१ जुलै – ४ ऑगस्ट २०२५):** *SNBP इंटरनॅशनल स्कूल* येथे धार्मिक व सामाजिक शांततेची कार्यशाळा* *SNBP शाळा व HWPL* यांच्यात *Peace School MoU* साइनिंग* *TJ कॉलेज* येथे Peace School MoU तसेच यूथ लीडरशिप कार्यक्रम* *BARTI केंद्रात* युवक व महिला नेतृत्व संवाद* *इको १० मिनिट मोहिम* अंतर्गत शाळांमध्ये पर्यावरण जनजागृती*Peace School MoU विषयी:*या कराराअंतर्गत शाळांनी त्यांच्या अभ्यासक्रमात आणि उपक्रमात *मानवतेचा आदर, अहिंसा, व सामाजिक समता* या मूल्यांचा समावेश करण्याचे वचन दिले. पुण्यातील *SNBP* आणि *TJ कॉलेज* या शैक्षणिक संस्थांनी HWPL सोबत शांती शिक्षणासाठी औपचारिक सहकार्य केले.*सहभाग व संकल्प:*या दौऱ्यात धार्मिक नेते, युवा स्वयंसेवक, महिला प्रतिनिधी, आणि Peace Education प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्त व सक्रीय सहभाग घेतला.कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध धर्मगुरू यांच्यात शांततेसंबंधी सखोल संवाद झाला. धर्म आणि शिक्षणातील सहसंबंध, महिला नेतृत्व, तरुणांची भूमिका आणि शांती शिक्षणाचा प्रभाव यावर भर देण्यात आला.HWPL च्या शांती शिक्षण उपक्रमांमधून युवा पिढीमध्ये *समजुती, संवाद, आणि सहअस्तित्वाची भावना* दृढ करण्याचे कार्य यशस्वीपणे झाले.* "शांतता ही फक्त कल्पना नसून कृतीत आणायचे"* – असा प्रभावी संदेश सर्व कार्यक्रमांमधून मिळाला.

## पी एम श्री जिल्हा परिषद प्रशाला, लाडसावंगी येथे इको क्लब स्थापन




**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पाणी आणि संसाधनांचे संवर्धन, स्वच्छता, पर्यावरण जागरूकता यासारखे विविध विषय, कौशल्ये, क्षमता या सर्व विद्यार्थ्यांमध्ये रुजल्या पाहिजेत असे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने पी. एम. श्री जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी. ता. जि. छ.संभाजीनगर येथे मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन यांच्या अध्यक्षतेखाली मिशन लाईफ अंतर्गत इको क्लब ची स्थापना करण्यात आली. इको क्लब चे टिचर इन्चार्ज श्री नामदेव पवार यांनी विद्यार्थ्यांना इको क्लब बद्दल मार्गदर्शन केले. इको क्लब चे विद्यार्थी प्रमुख कु.शीतल कुदळे,तसेच सदस्य यश पवार, आलिया बागवान,अनिकेत भालेराव,भावना वानखेडे,सचिन वीर,साक्षी बैनाडे,वर्षा कदम,अनन्या रासने,चेतन पवार यांची निवड करण्यात आली. सारीका जैन .....*निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा.....निरोगी आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन देऊन पर्यायांना प्रोत्साहन देऊन प्लास्टिकमुक्त भारत,ऊर्जेची बचत,पाण्याचा योग्य वापर,कचऱ्याचे व्यवस्थापन,ई कचऱ्याची योग्य विल्हेवाट ई. चा अवलंब करून संवर्धन उपायांना प्रोत्साहन देण्याची प्रतिज्ञा विज्ञान शिक्षिका श्रीम. सारिका जैन यांनी विद्यार्थ्यांना दिली.आतापर्यंत आम्ही शाळेत इको क्लब अंतर्गत क्यू. आर. कोड फॉर फ्लोरा, किचन गार्डन, एक पेड़ माँ के नाम हे उपक्रम राबवले आहेत. राखीपौर्णिमा निमित्ताने आम्ही सर्व शिक्षक आणि विद्यार्थी शाळेतील सर्व झाडांना राखी बांधुन त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा *रक्षासूत्र* कार्यक्रमातून घेणार आहोत असे मुख्याध्यापक नजन यांनी सांगितले.श्री सचिन धस,उत्तम कोळेकर यांनी पर्यावरण संवर्धना विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. प्रसंगी सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

## कालिकादेवी विद्यालयात, वृक्षारोपण संपन्न



**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.) येथे महाराष्ट्र शासणाच्या आदेशानुसार 'ऑगस्ट २०२५ मध्ये एकाच वेळी महावृक्ष लागवड अभियान' अंतर्गत शिरूर (का.) तालुक्याचे तहसिलदार मा. सुरेश घोळवे साहेब गट शिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे साहेब, विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब व वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे साहेब या मान्यवरांच्या हस्ते कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या परिसरात 'महावृक्ष लागवड अभियान' राबवून प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून १०१ वृक्षांची लागवड करण्यात आली. 'हरित महाराष्ट्र-समृद्ध महाराष्ट्र' या उपक्रमा अंतर्गत 'हरित बीड' करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुध्दा 'वृक्षारोपण जनजागृती' हा उपक्रम संपूर्ण बीड जिल्ह्यात राबविला. त्याचाच एक भाग म्हणून कालिकादेवी विद्यालयाने विविध प्रकारची झाडे लावून 'महावृक्ष लागवड अभियान' राबवून यशस्वी केले. यावेळी भटक्या विमुक्तांच्या प्रदेशउपाध्यक्षा ॲड.भाग्यश्री ढाकणे (चेमटे), उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय तुपे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा. महारूद्र डोंगरे, विज्ञान प्रमुख प्रा. संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा. नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे, प्रा. विनोद गलांडे, प्रा. अनिल जरे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा. विश्वास ढाकणे, प्रा. नारायण तांबे, प्रा. दत्ता शिंदे, प्रा. बाळासाहेब खटाणे, प्रा. अमर खोले, प्रा. सौ. सिमा ढवळे मॅडम, कवयित्री सानिका खेडकर मॅडम व तहसिल मधील कर्मचारी, गटशिक्षणधिकारी कार्यालयातील कर्मचारी, वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी 'वृक्षारोपण' या राष्ट्रीय उपक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी 'महावृक्ष लागवड अभियानात सहभाग नोंदवविला.




## विकसित भारताचा संकल्प ए. आय. तंत्रज्ञानाच्या जोरावर - चंद्रशेखर बावनकुळे



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेतरस्त्यासह शेतकरी शेतमजुरांच्या प्रश्न सोडवत विकसीत महाराष्ट्राच्या विकासाला हातभार लावला आहे. बसवराज पाटील यांनी संपूर्ण जीवन जनतेसाठी समर्पीत केले आहे. त्यामुळे रात्री अकरा वाजले तरी सभेत टाचणी पडली तरी आवाज येईल अशी सुंदर सभा आहे. मनुष्य किती जगला यापेक्षा कसा जगला हे महत्त्वाचे आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ अशा अनेक संकटांचा सामना केला. संकटांचा थोडा काळ आसतो आपल्या प्रामाणिकपणामुळे यातुन सही सलामत बाहेर पडलात. २३७ आमदार घेऊन महायुतीचे सरकार आले हा बसवराज पाटील यांचा पायगुण आहे. राज्यातील सर्व शेतरस्ते १२ फुटांचे होणार आहेत. येत्या पाच वर्षात राज्यातील संपूर्ण शेतरस्ते डांबरीकरण करण्याची हमी महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना व शरण पाटील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कारखाना परिसरात गुरुवारी (दि.७) ऊस शेतीसाठी ए. आय. तंत्रज्ञानाची कार्यशाळा व शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना महसुमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बसवराज पाटील, माजी मंत्री आ. राणाजगजितसिंह पाटील, संजय कोडगे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, युवा नेते शरण पाटील, सुनिल चव्हाण, किरण पाटील, मिलिंद पाटील, नितीन काळे, व्यंकटराव गुंड, कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने, बसवराज कस्तुरे, बलभिम पाटील आदी मान्यवर उपस्थितीत होते.पुढे बोलताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, विकसित भारताचा संकल्प ए. आय. तंत्रज्ञानाच्या जोरावर केला आहे. इथेनॉल व ऊस गाळपासाठी वेगवेगळे तंत्रज्ञान वापरायचे आहे. ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत विज पुरवठा करुन दिवसा १२ तास वीज पुरवठयासह घरगुती विजेचे दर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता भावकीमध्ये शेती विकायची असेल तर ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर तर वाटणीपत्र २०० रुपयांच्या स्टॅम्पवर होणार आहे. शेतकरी, शेतमजूर, उद्योजक यांच्यासाठी मागेल ती मदतीसाठी सरकार कटिबद्ध असल्याचे अभिवचन बावनकुळे यांनी दिले. यावेळी बोलताना बसवराज पाटील म्हणाले की, शरण पाटील फाउंडेशनच्या वतीने सर्वच शेतकऱ्यांना फाउंडेशनच्या वतीने लोक वाटा देऊन काम सुरू आहे. ही लोकचळवळ झाली आहे. मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळवून देऊन मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करावे, बंद कारखाने सुरु करुन नविन उद्योग मराठवाड्यात आणुन युवकांना रोजगार उपलब्ध करून दयावा व जिल्हा बँकेला मदत करुन गतवैभव मिळवून देण्याची मागणी यावेळी श्री पाटील यांनी केली. यावेळी शरण फाऊंडेशनचे अध्यक्ष शरण पाटील यांनी प्रास्ताविकात शेतकऱ्यांसाठी विठ्ठलसाईच्या माध्यमातून अविरत काम सुरू आहे. उमरगा व लोहारा तालुक्यातील शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेतरस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असुन शेतरस्त्यासाठी शासनाचा निधी वाढवण्याची मागणी यावेळी केली. या मेळाव्यात शेतकरी बांधव हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांसाठी, एआय प्रचंड प्रमाणात माहिती उलगडू शकते जी त्यांना त्यांच्या पिकांसाठी अधिक हुशार निवडी करण्यास मदत करू शकते आणि ते ज्या शेतात वाढतात त्यांचे संरक्षण करते.शेतकऱ्यांचे चांगले हेतू असूनही, निसर्गमातेच्या इच्छा पिकांच्या उत्पादनाचे आरोग्य आणि गुणवत्ता - आणि शेवटी, शेतकऱ्यांचे उत्पन्न - बनवू किंवा बिघडू शकतात.म्हणून, लागवडीच्या हंगामासारख्या विशिष्ट वेळी हवामानाचा अंदाज लावू शकतील अशा भाकित साधनांनी शेतकऱ्यांना सुसज्ज करणे म्हणजे ते त्यांची पिके भरभराटीसाठी आदर्श परिस्थितीत लावू शकतात. ही साधने शेतकऱ्यांना जोखीम व्यवस्थापित करण्यास देखील मदत करतात. तीव्र हवामान घटनेची पूर्वसूचना मिळाल्याने शेतकऱ्यांना त्यांची पिके सुरक्षित करण्यासाठी आणि शक्य तितके त्यांचे संरक्षण करण्यासाठी एक महत्त्वाची खिडकी उघडते. यामुळे वादळात पिकांच्या काही ओळींचे नुकसान आणि संपूर्ण पिकाचे नुकसान यातील फरक दूर होऊ शकतो.प्रेडिक्टिव्ह परफॉर्मन्स ॲनालिटिक्सची हीच ताकद आहे. ते एआय आणि मशीन लर्निंगचा वापर करून दशकांच्या ऐतिहासिक डेटाचा अभ्यास करून परिणामांचा अंदाज लावते आणि जोखीम अपेक्षित करते.तथापि, ही विश्लेषणात्मक साधने केवळ हवामान अंदाजापुरती मर्यादित नाहीत. त्यांचा वापर कीटक आणि रोगांचे धोके, मातीची परिस्थिती, पीक वाढ आणि उत्पन्न क्षमता यांचा अंदाज घेण्यासाठी देखील केला जाऊ शकतो.हे शेतकऱ्यांना रोगांच्या प्रादुर्भावाची आणि कीटकांच्या प्रादुर्भावाची रिअल-टाइम माहिती देते, जेणेकरून ते गरज पडल्यास अचूक उपचार लागू करू शकतील. याचा अर्थ शेतकरी त्यांचा रासायनिक वापर कमी करू शकतात, त्यांचा पर्यावरणीय परिणाम कमी करू शकतात आणि शेतीवर अधिक शाश्वत राहू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता शेतीत क्रांती घडवत आहे, परंतु सर्वच शेतकरी त्याचे फळ मिळवत नाहीत.समान संधी उपलब्ध नसल्यास, या 'एआय डिव्हिडन्स'मुळे लहान शेतकरी आणि मोठ्या प्रमाणात काम करणाऱ्या शेतकऱ्यांमधील दरी वाढण्याचा धोका आहे.पण आपण एआय क्रांतीचे लोकशाहीकरण करू शकतो. तंत्रज्ञान सर्व शेतकऱ्यांना सक्षम बनवते याची खात्री करून, त्यांच्या शेताचा आकार किंवा स्थान काहीही असो, आपण शेतीतील एआय असमानता दूर करू शकतो. प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे क्रांतिकारी बदल घडत आहेत. कृषी क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. येत्या काळात बदलते हवामान, अवेळी पडणारा पाऊस, पीकांवर वारंवार होणारा रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांचा तुटवडा यांवर मात करत शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नाही. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचे विश्लेषण, मातीतील कार्बन प्रमाण शोधणे, मातीच्या आरोग्याची सविस्तर माहिती, तणाचा प्रकार ओळखणे, पूर्वीच्या उत्पन्नाची तुलना, मातीचे तापमान, वातावरणातील आर्द्रता, पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, तसेच पिकांवरील जैविक-अजैविक ताण ओळखणे शक्य होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पीकांच्या उत्पादनात वाढ, मजुरी खर्चात बचत, रसायनिक खते व औषधांच्या वापरात कपात, कापणी कार्यक्षमतेत वाढ, रोगनियंत्रणाद्वारे बचत, पुरवठा साखळीतील कार्यक्षमतेत वाढ आणि एकूण खर्चात कपात होणे शक्य होईल; असे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.या वेळी पाऊस व रात्री ऊशीर झाला असतानाही परिसरातील शेतकरी , शेतमजुर, व्यापारी, कार्यकर्ते,पदाधिकारी यांची मोठ्या सख्येने ऊपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## मनसे पदाधिकारी यांनी घेतली पोलीस आयुक्तांची भेट



**दौलताबाद (जावेद अहमद)** : संकेत बाळासाहेब शेटे हे आपल्या दोन मित्रांसोबत आपल्या कार ने करोडी टोल नाक्यावरून जात असताना त्यांचे फास्ट टेग ने टोल कटले होते त्यांनी रस्त्यावर लाइट व खड्डे असल्याने तुम्ही टोल कसे घेतात म्हणून तक्रार देण्यासाठी ऑफिस गेले असता त्यांना प्रभू बागुल सह सहा जणांनी मारहाण केली असल्याचे तक्रार दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली होती आज मनसे पदाधिकारी यांनी पोलीस आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांना निवेदनात नमूद केले आहे की सर्व गुंड प्रवृत्ती चे करोडी टोल वसुली करणाऱ्या एजन्सीच्या संरक्षणात काम करत असून, एजन्सीचे मालक व त्यांच्या साथीदारांचाही गुंडगिरीस थेट पाठिंबा आहे, प्रभू बागुल व त्याच्या गुंड साथीदारांना त्वरित अटक करण्यात यावी.,टोल वसुली एजन्सीचे मालक व त्यांचे गुंडगिरीस पाठबळ देणारे साथीदार यांच्यावरही कारवाई करून त्यांची पोलीस पडताळणी व प्रमाणपत्र तपासणी करण्यात यावी. टोल कार्यालयात सुरू असलेले दारू व गांजाचे अड्डे तात्काळ बंद करून, अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी टोलनाक्यावर पोलीस बंदोबस्त, CCTV कॅमेरे सहित नागरिकांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी स्वतंत्र व सुरक्षित यंत्रणा उपलब्ध करून द्यावा. अनेक गुन्ह्यात हात असणाऱ्या प्रभू बागुल व त्याचे सर्व संबंधित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना तडीपार करण्यात यावे असे निवेदन दिले आहे. यावेळी प्रकाश महाजन, दिलीप चितलांगे, बिपीन नाईक ,आशीष सुरडकर, संकेत शेटे, मनिष जोगदंडे, राहुल पाटील, प्रशांत आटोळे उपस्थित होते

## मी मंत्री गिरीश महाजन यांचा पुतण्या : तुला नोकरी लाऊन देतो, नाशिकमध्ये १९ वर्षीय तरुणीला घातला गंडा




**नाशिक** : सरकारी नोकरी मिळवण्याच्या इच्छेने अनेक तरुण-तरुणी दिवसरात्र कष्ट करतात, विशेषतः पोलीस दलात भरती होऊन जनतेची सेवा करण्याचे अनेकांचे स्वप्न असते. मात्र, याच स्वप्नाचा फायदा घेत १९ वर्षीय तरुणीची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या नावाचा गैरवापर केल्याचे उघड झाले आहे. मी गिरीश महाजन यांचा पुतण्या असल्याचे सांगत नोकरीचे आमिष दाखवत फसवणूक करण्यात आली आहे.

घटनेची अधिकची माहिती अशी की, नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील सायखेड येथे एका तरुणीची फसवणूक करण्यात आली आहे. मी मंत्री गिरीश महाजन यांचा पुतण्या आहे. मी पोलिस दलात नोकरी लाऊन देतो असे आमिष दाखवत १९ वर्षीय युवतीची फससवणूक करण्यात आली आहे. या तरुणीकडून आतापर्यंत साडेचार लाख रुपये उकळल्याचे समोर आले आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

आरोपी अभिषेक प्रभाकर पाटील याने आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार दिलीप बनकर आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या जवळचे असल्याचा दावा केला. त्याने निफाड तालुक्यातील औरंगपूर येथील स्वाती राजेंद्र चाबुकस्वार या तरुणीला पोलिस भरतीचे खोटे आश्वासन दिले.

अभिषेकने स्वाती आणि तिच्या आईला मुंबईला नेऊन दादर येथे काही दिवस ठेवले. तिथे त्याने त्यांना नियुक्तीची बनावट ऑर्डर दाखवली आणि एका अकादमीत प्रवेश मिळवून दिला. त्यानंतर त्याने स्वातीच्या आईकडे आठ लाख रुपयांची मागणी केली. फसवणूक झाल्याचे लक्षात येण्यापूर्वी स्वातीच्या आईने त्याला चार लाख रुपये दिले होते.

आपली फसवणूक लक्षात आल्यानंतर, १९ वर्षीय स्वाती राजेंद्र चाबुकस्वार हिने सायखेडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी अभिषेक प्रभाकर पाटील याला अटक केली असून त्याला एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेमुळे नेत्यांच्या नावाचा वापर करून होणाऱ्या फसवणुकीचा प्रकार पुन्हा एकदा उघड झाला आहे. भाजपचे नाशिक जिल्हाध्यक्ष यतीन कदम यांनी अशा कृत्यांमुळे नेत्यांची बदनामी होते, असे सांगत आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.






## पुण्यातील वाहतूक वेग प्रतितास ३० किमी करण्याचा प्रयत्न - मुख्यमंत्री फडणवीस



**पुणे** : शहरातील वाहतूक वेग सध्या प्रतितास 19 किलोमीटरपेक्षा कमी आहे. हा वेग प्रतितास 30 किलोमीटरपर्यंत वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, पुण्यातील वाहतूक कोंडी कमी करून वाहतुकीला गती देण्यासाठी डिसेंबर 2025 पर्यंत विशेष प्रयत्न केले जातील.

पुण्याच्या पुढील 30 वर्षांच्या नियोजनासाठी एक लाख 30 हजार कोटी रुपयांचा एकत्रित मोबिलिटी प्रकल्प राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात 65 हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येईल. सध्या पुण्यात दोन हजार सार्वजनिक बसेस आहेत. आगामी काळात हा आकडा सहा हजार इलेक्ट्रिक बसेसपर्यंत नेण्याचा उद्देश आहे.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शुक्रवारी पुण्यातील राज्यस्तरीय पायाभूत सुविधांबाबत दोन दिवसीय महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. कमी वेळात पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे ठरवले आहे. राज्यात नऊ लाख कोटींचे प्रकल्प सुरू असून ते लवकर पूर्ण झाल्यास जनतेला फायदा होईल.

पुणे शहर आणि परिसराचा पुढील 30 वर्षांचा विकास लक्षात घेता एकत्रित विकास प्रकल्प तीन टप्प्यांत राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पात 2200 चौरस किलोमीटर परिसर समाविष्ट आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर पहिल्या टप्प्यात 30 टक्क्यांपर्यंत आणि नंतर 50 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे.

पुण्यात वाहनांची संख्या मोठी असून रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी जमिनीखालून रस्ते तयार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. एकमेकांना जोडणारे भूमिगत बोगदे तयार करण्याचेही नियोजन आहे. मुख्यमंत्र्यांनी देशात मुंबई, नागपूर आणि पुण्यातील मेट्रोचे काम सर्वात वेगाने सुरू असल्याचेही सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

# आदिवासी अस्मिता आणि अधिकारांचा सन्मान : जागतिक आदिवासी दिन

मानवी संस्कृतीचा इतिहास सांगताना आपण नेहमीच आदिवासी समाजाचा विचार करणे आवश्यक मानतो, कारण हाआदिवासी समाजच खरे तर मानवी संस्कृतीचा पाया आहे. निसर्गाशी तादात्म्य पावलेली त्यांची जीवनपद्धती, जमिनीशी जोडलेली अर्थव्यवस्था, समुदायकेंद्रित मूल्यव्यवस्था आणि सामाजिक न्यायाचे सहज तत्त्व, ही सगळी वैशिष्ट्ये मानवी उत्क्रांतीच्या सुरुवातीपासूनच त्यांच्या जीवनात खोलवर रुजलेली आहेत. त्यामुळेच त्यांच्या अस्तित्वाला मान्यता देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या आवाजाला समाजाच्या मध्यभागी आणणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नव्हे तर मानवी मूल्यांची जपणूकही ठरते. या भावनेतूनच दरवर्षी०९ ऑगस्ट रोजी जागतिक पातळीवर 'जागतिक आदिवासी दिन' साजरा केला जातो.

२३ डिसेंबर १९९४ च्या ठराव क्र. ४९/२१४ द्वारे, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने निर्णय घेतला की जगातील आदिवासी लोकांच्या आंतरराष्ट्रीय दशकादरम्यान (१९९५-२००४) दरवर्षी ०९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा केला जाईल .दि. ०९ ऑगस्ट ही तारीख १९८२ मध्ये मानवी हक्कांच्या संवर्धन आणि संरक्षणावरील उप-आयोगाच्या आदिवासी लोकसंख्येवरील संयुक्त राष्ट्रांच्या कार्यगटाच्या पहिल्या ऐतिहासिक बैठकीच्या दिवसाची आहे. ज्या दिवशी म्हणजेच दि. ०९ ऑगस्ट १९८२ रोजी ही बैठक झाली त्याच बैठकीच्या आठवणीच्या समानार्थ हा ०९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने निवडला आहे. दरवर्षी ०९ ऑगस्ट या दिवशी जगभरातील ५००० हून अधिक आदिवासी समूहांच्या अधिकारांसाठी, सांस्कृतिक जतनासाठी आणि त्यांना विकासाच्या प्रवाहात समाविष्ट करताना त्यांच्या अस्मितेला कोणतीही हानी पोहोचू नये यासाठी विविध कार्यक्रम राबवले जातात.

भारतात सुमारे ८.६ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातींमध्ये मोडते. गोंड, सांताळ, भिल्ल, वारली, कोकणा, कोरकू, कोलम, पावरा, कातकरी, माडिया गोंड, पारधी, कोळी महादेव, उराव, अंध यांसारख्या शेकडो आदिवासी जमाती आजही आपली स्वतंत्र ओळख, भाषा, संस्कृती आणि परंपरा टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करत आहेत. यांची जीवनपद्धती शेती करणे, शिकार करणे, वनोपज संकलन करणे, हस्तकला उद्योग आणि परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर आधारित आहे. त्यांच्या सण-उत्सवांमध्ये, लोककथांमध्ये, नृत्यगायनात, चित्रशैलीत एक विलक्षण सर्जनशीलता दिसते. मात्र दुर्दैवाने या समाजांना ऐतिहासिक काळापासून शोषण, विस्थापन, उपेक्षा आणि अन्यायाचा सामना करावा लागला आहे. औद्योगिकीकरण, मोठे पायाभूत प्रकल्प, धरणे, खाणकाम, जंगलतोड यामुळे लाखो आदिवासींना पिढ्यानपिढ्या राहिलेल्या भूमीवरून उचलून स्थलांतरित केले गेले. विस्थापनानंतर ना त्यांना समर्पक रोजगार मिळाला ना योग्य पुनर्वसन, परिणामी आजही लाखो आदिवासी गरिबी, कुपोषण, अशिक्षितपणा, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या यांना सामोरे जात आहेत.

आदिवासी समाजातील महिलांची परिस्थिती आणखी जटिल आहे. त्या कुटुंब, शेती, जंगलातील उपजिविका यांचे आधारस्तंभ असतानाही त्यांना शिक्षण, आरोग्य, निर्णय प्रक्रियेतील सहभाग याबाबतीत दुहेरी अन्यायाला तोंड द्यावे लागते. बालविवाह, मातामृत्यू, पोषणाची कमतरता, शारीरिक-मानसिक शोषण या समस्या अद्यापही व्यापक स्वरूपात दिसतात. आदिवासी मुलांमध्ये शाळा गळतीचे प्रमाण चिंताजनक आहे. अपुऱ्या शिक्षण सुविधा, स्थानिक भाषेतील अभ्यासक्रमांचा अभाव, शिक्षकांची अनुपस्थिती, दळणवळणाच्या मर्यादा, कुपोषित स्थिती यामुळे मुला-मुलींना शिक्षणात टिकवणे कठीण जाते. परिणामत: पिढ्यानपिढ्या उपेक्षा आणि गरीबीचे दुष्टचक्र सुरू राहते.

भारतातील आदिवासींमध्ये आरोग्य विषयक समस्याही मोठ्या प्रमाणात आहेत. दुर्गम वस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अभाव, प्रशिक्षित कर्मचारी न मिळणे, स्वच्छ पाणी आणि पोषणाच्या कमतरतेमुळे मलेरिया, रक्तक्षय, अतिसार, कुपोषण, माता व बालमृत्यू यांचे प्रमाण जास्त आहे. या सगळ्या परिस्थितीवर उपाय म्हणून शासनाने वनहक्क कायदा २००६, पेसा कायदा, अनुसूचित जमाती उपयोजना, शिक्षण व आरोग्य विकास योजना, आदिवासी विकास प्राधिकरणे यांसारखी अनेक धोरणात्मक पावले उचलली आहेत. पण या योजनांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने प्रभावी होण्यासाठी स्थानिक पातळीवर आदिवासींचा विश्वास जिंकणे, पारदर्शकता राखणे, त्यांचे पारंपरिक सत्ताकेंद्र, ग्रामसभा आणि स्थानिक निर्णयप्रक्रिया यांना बळकट करणे आवश्यक आहे. कारण आदिवासी समाज हा केवळ लाभार्थी नसून स्वत: निर्णय घेण्याची क्षमता असलेला एक समुदाय आहे. त्यांच्या ज्ञानसंपदेचा, व्यवस्थापन कौशल्यांचा आणि पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा आदर राखूनच विकासाची दिशा ठरली पाहिजे.



आधुनिक विकासाच्या नावाखाली आदिवासी संस्कृती, भाषा, परंपरा आणि पर्यावरण नष्ट करणे ही कोणत्याही अर्थाने प्रगती नव्हे. उलट, त्यांच्या परंपरागत ज्ञानातूनच हवामान बदल, अन्न सुरक्षा, औषधनिर्मिती, जैवविविधता संवर्धन याबाबत अनेक उत्तरे मिळू शकतात. आदिवासी समाज हे आपल्या देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाचे अविभाज्य अंग आहे, त्यांना उपेक्षित ठेवून खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास शक्य नाही. 'जागतिक आदिवासी दिन' ही संधी आहे की आपण आपल्या धोरणांवर, दृष्टिकोनावर आणि कामकाजावर पुनर्विचार करावा. आदिवासी समाजाला "मुख्य प्रवाहात आणणे" हेच अंतिम ध्येय असावे असेही नाही, तर त्यांच्या सन्माननीय अस्तित्वाला जपून, त्यांच्या परंपरा टिकवून, त्यांच्या निर्णय प्रक्रियेत त्यांना सामावून घेणारे विकासमूलक दृष्टिकोन स्वीकारणे हीच खरी गरज आहे.

शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे आणि समाजातील संवेदनशील नागरिक यांनी आदिवासी समाजाच्या प्रश्नांना डोळसपणे समजून घेतले पाहिजेत. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर तर आदिवासी समाजाचे योगदान खूपच मौल्यवान आहे. ते वनसंपत्तीचे रक्षक आहेत, पाण्याचे संवर्धक आहेत, नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर करणारे आहेत. त्यांच्या ज्ञानात हवामान बदलाला तोंड देण्याची क्षमता आहे. म्हणूनच त्यांचे अस्तित्व जपणे म्हणजे मानवी भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. आदिवासी समाजाच्या नेतृत्वाला चालना देणे, आदिवासी युवकांना शिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी देणे, आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देणे आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा विश्वास निर्माण करणे या गोष्टी आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहेत. आदिवासींचे हक्क हे केवळ वनसंपत्ती, जमिनी किंवा आरक्षणापुरते मर्यादित नसावेत, तर स्वाभिमान, संस्कृती, भाषा, पर्यावरण आणि सर्जनशीलता या सर्व घटकांचा समावेश असावा.

आदिवासींच्या अनेक भाषा आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्या वाचवण्यासाठी स्थानिक भाषेतील शिक्षण, संशोधन, लोकसाहित्याचे दस्तऐवजीकरण, तरुण पिढीमध्ये अभिमान जागवणे यासाठी विशेष प्रयत्न व्हायला हवेत. त्यांच्या नृत्यकला, चित्रकला, हस्तकला, लोकगीत यांना राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळावे, त्यांच्या कलाकारांना प्रोत्साहन मिळावे, हे देखील महत्त्वाचे आहे. हा केवळ आदिवासींच्या गौरवाचा प्रश्न नाही, तर भारतीय संस्कृतीच्या समृद्ध वारशाचा भाग आहे. 'जागतिक आदिवासी दिन' साजरा करताना या सर्व मुद्द्यांचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. 'जागतिक आदिवासी दिन' हा केवळ कार्यक्रम, भाषणे, घोषणा यापुरताच मर्यादित न राहता, प्रत्यक्ष कृतीतून बदल घडवण्याचा संकल्प या दिवशी व्हायला हवा. आदिवासी समाजाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर समतेच्या नजरेने पाहणे, त्यांना सक्षम भागीदार म्हणून स्वीकारणे, त्यांच्या संघर्षांना न्याय देणे, हेच खरे जागतिक आदिवासी दिनाचे सार आहे.

आदिवासींच्या अस्तित्वाचा सन्मान म्हणजेच आपल्या समाजाच्या मानवी मूल्यांचा सन्मान होय. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाला आदिवासी समाजाच्या परंपरा, ज्ञान, भाषा, कलाकृती, जीवनशैली यांची मोठी प्रेरणा मिळू शकते. म्हणून दि. ०९ ऑगस्टला साजरा होणारा 'जागतिक आदिवासी दिन' आपण उत्सवाच्या पलीकडे नेऊन, कृतीशील, जबाबदार, संवेदनशील आणि मानवी हक्कांना समर्पित असा साजरा केला पाहिजे. आदिवासी समाजाला टिकवणे, समृद्ध करणे, आणि त्यांच्याशी समानतेचे नाते प्रस्थापित करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे, कारण आदिवासींच्या सुरक्षित भविष्यातच मानवी समाजाच्या शाश्वत विकासाचा खरा आधार दडलेला आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**नाशिक** (लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत.)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल – bagate.rajendra4@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002